महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि. २८/ १० /२०२५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अ, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-8A (E-११६८०५०),
दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २.०
# गांडूळ खत उत्पादन युनिट आणि नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षापासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभूधारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनामार्फत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

सेंद्रीय शेती पद्धतीमध्ये निसर्ग संवर्धन करणे, पिक उत्पादनाचा खर्च कमी करणे, रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके व संप्रेरके या सारख्या घातक रसायनांना पर्यायी अशा सेंद्रिय व जैविक निविष्ठाचा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. गांडूळ खत किंवा व्हर्मी कंपोस्ट हे शेतातील काडी कचरा, वनस्पतीजन्य पदार्थ, शेण यांचेपासून गांडूळांद्वारे बनविले जाते. गांडूळ खतामध्ये विविध जिवाणू, संजिवके, व्हीटॅमिन्स आणि इतर उपयुक्त रसायने  असल्याने त्याचा पिकांच्या वाढीवर चांगला परिणाम होतो.

याचबरोबर शेतातील कचऱ्यावर कंपोस्टिंगव्दारा प्रक्रिया केल्यास त्यातील सेंद्रिय पदार्थ जैविक पध्दतीने, सूक्ष्मजीव तसेच गांडुळांव्दारे कुजून त्यापासून उत्तम प्रकारचे ह्युमस सारखे सेंद्रिय कंपोस्ट खत तयार होते. या खताचा वापर शेतात मोठया प्रमाणात केला गेल्यास, जमिनीचे आरोग्यात विशेष सुधारणा होऊन, कृषि उत्पादनात फार मोठी भर पडेल. शेतातून निघालेल्या सर्व वनस्पतीजन्य पदार्थापासून सेंद्रिय खत तयार करून, परत शेतात टाकणे ही काळाची गरज आहे. सेंद्रिय खतामुळे जमिनीचा कस व जलधारणा शक्ती वाढून पोषक द्रव्यांचा पुरवठा योग्य प्रमाणात होतो. जमिन भुसभुशीत राहते. त्यामुळे जमिनीत हवा खेळती राहते. शेतात उपयुक्त सूक्ष्म जिवाणूंची वाढ होण्यास मदत होते.

या अनुषंगाने सदरची बाब विचारात घेऊन गांडूळ खत उत्पादन युनिट आणि नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट हे वैयक्तिक  लाभाचे घटक  राबविणे प्रस्तावित आहे.

**१. उद्दिष्टे:**

१.१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेल्या गावसमुहातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.

१.२. पौष्टिक अन्नधान्याचे उत्पादन करणे.

१.३. नैसर्गिक घटकांना हानी न पोहोचविता त्यांचा योग्य वापर करुन शेती करणे.

१.४. जमिनीची सुपिकता वाढविणे व ती दिर्घकाळ टिकविणे.

१.५. स्थानिक स्त्रोतांचा पुर्नवापर शेतीमध्ये करणे.

१.६. शेतीचा उत्पादन खर्च कमी करुन शेतक-याच्या निव्वळ उत्पन्नात वाढ करणे.

**२. लाभार्थी निवडीचे निकष:**

२.१. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावातील ५ हे पर्यंत जमीनधारणा असणारे शेतकरी सदर घटकासाठी पात्र राहतील.

२.२. इतर कोणत्याही योजनेतून या घटकाचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत पुन्हा लाभ देण्यात येणार नाही.

२.३. शेतकऱ्याकडे गांडूळ खत उत्पादन युनिट, नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट उभारण्याकरिता आवश्यक तेवढी जागा उपलब्ध असावी.

२.४. इच्छुक शेतकऱ्याकडे किमान दोन मोठे (गाई/म्हैस/बैल) पशुधन उपलब्ध असावेत.

**३. अर्थसहाय्य:**

३.१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या गांडूळ खत उत्पादन युनिट, नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट हे वैयक्तिक लाभाचे घटकासाठी अनुज्ञेय अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे आहे

| अ. क्र. | घटक | युनिट आकार | अर्थसहाय्य रक्कम रु. | | अनुदानासाठी समाविष्ट बाबी |
|---|---|---|---|---|---|
| | | | मापदंड | अनुदान | |
| १ | गांडूळ खत युनिट | एचडीपीई गांडूळ खत बेड (HDPE VERMIBED) १२ X ४ X २ फुट (MIDH- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान) | रु. १६०००/- प्रती युनिट (MIDH- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान) | सदरील युनिटसाठी अनुदान हे मापदंडाच्या ५० % किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० % जे कमी असेल ते लागू राहील | HDPE VERMIBED, गांडूळ बीज खरेदी, मजुरी, पाणी देणे इ. बाबींवरील खर्च |
| | | टाकीचे बांधकाम ३.६ X १ X ०.७५ मीटर | MREGS- मग्रारोहयो शा.नि. १.१०.२०१६ | रु. ११५२० /- | गांडूळ खत युनिट बांधकाम, गांडूळ बीज खरेदी, खड्डा खोदणे, मजुरी, पाणी देणे इ. बाबींवरील खर्च |
| २. | नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट | ३.६ X १.५ X ०.९ मीटर (भिंतीची जाडी ९ इंच व ७ इंच आकारमानाचे झरोके चारही बाजूस) | MREGS- मग्रारोहयो शा.नि. १.१०.२०१६ | रु. १०७४६/- | काडी कचरा गोळा करणे, टाकीचे वीट बांधकाम, टाकी भरणे, पाणी देणे इ. |

- इच्छुक लाभार्थी गांडूळ खत व नाडेप या दोन्ही घटकाचा लाभ घेऊ शकतात.
- गांडूळ खत युनिटसाठी HDPE किंवा बांधकाम यापैकी एका पद्धतीची निवड करण्याची लाभार्थ्यास मुभा राहील.

३.२. गांडूळ खत युनिट उभारणीः पाण्याचा निचरा होणाऱ्या हवेशीर जागेवर ३.६ X १ X ०.७५ मीटर या आकारमानाचे बांधकाम करुन युनिटची उभारणी सावलीमध्ये करावी.

३.३. नाडेप खत युनिट उभारणीः पाण्याचा निचरा होणा-या हवेशीर जागेवर ३.६ X १.५ X ०.९ मीटर तसेच भिंतीची जाडी ९ इंच, तसेच खेळती हवा रहाण्यासाठी ७ इंच आकारमानाचे झरोके चारही बाजुस, या आकारमानाचे बांधकाम करुन युनिटची उभारणी सावलीमध्ये करावी.

३.४. वरील दोन्ही प्रकारच्या बांधकामासाठी अंदाजपत्रक तयार करून डेस्क ४ वर सहाय्यक कृषि अधिकारी यांनी अपलोड करावे.

## ४. प्रशिक्षण

४.१. पूर्वसंमती प्राप्त शेतकऱ्यांना गांडूळ खत व नाडेप कंपोस्ट तयार करणे याबाबत प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

४.२. सदर प्रशिक्षण हे कृषी विद्यापीठ/ कृषी संशोधन केंद्र/कृषी विज्ञान केंद्र/तालुका बीज गुणन प्रक्षेत्र/ फळ रोपवाटिका इ. ठिकाणी आयोजित करावेत.

४.३. सदर प्रशिक्षणाचे मापदंड हे या कार्यालयाच्या परिपत्रकानुसार राहतील.

## ५. अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या

### ५.१. लाभार्थी

५.१.१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून अर्ज सादर करावा. तसेच आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

५.१.२. तालुका कृषि अधिकारी यांचेकडून ऑनलाईन पूर्वसंमती मिळाल्यानंतर मार्गदर्शक सूचनेमध्ये दिलेल्या तांत्रिक निकषाप्रमाणे संपुर्ण प्रकल्पाची उभारणी प्रथम करणे बंधनकारक राहील.

५.१.३. लाभार्थ्याने गांडूळ खत उत्पादन युनिट, नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट उभारणीसाठी आवश्यक साहित्य सामुग्री उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील. कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही.

५.१.४. निवडलेल्या लाभार्थींना त्यांच्या पसंतीच्या बांधकाम व्यवसायिक अथवा स्वत: अथवा गवंडी यांचे मार्फत गांडूळ खत उत्पादन युनिट अथवा नाडेप खत उत्पादन युनिटचे बांधकाम करुन घेण्याची मुभा राहणार आहे.

५.१.५. गांडूळ खत उत्पादन युनिट व नाडेप खत उत्पादन युनिटची उभारणी प्रकल्प स्थळी झाल्यानंतर देय अनुदान मागणीसाठी विहित नमुन्यातील काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र डीबीटी पोर्टलवर अपलोड करावे. HDPE गांडूळ खत युनिट साठी खरेदी केलेल्या HDPE साहित्याचे देयक अपलोड करावे.

५.१.६. प्रकल्पांतर्गत शासनाने ठरवून दिलेल्या खर्च प्रमाणकापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी लाभार्थ्याने स्वतः घ्यावी.

### ५.२. ग्राम कृषि विकास समिती (GKVS)

५.२.१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांचे घटकांतर्गत बाबीचा लाभ घेण्यासाठीचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर सर्व अर्ज व लाभार्थीने अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे

मदतीने छानणी करून अर्जाची अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांची, अनुसुचित जाती/जमाती, महिला शेतकरी, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करावी.

५.२.२. इच्छुक लाभार्थ्यांचे प्राप्त अर्जाच्या पात्र/अपात्रतेबाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.

५.२.३. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करावे.

**५.३. समूह सहाय्यक**

५.३.१. इच्छुक लाभार्थी शेतक-यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.

५.३.२. शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व शेतकऱ्यांने अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी करुन अर्जाची अत्यल्प व अल्पभूधारक अशी प्रवर्गनिहाय अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती, दिव्यांग, महिला शेतकरी, इतर सर्वसाधारण शेतकरी या प्राधान्यक्रमाने वर्गवारी करावी.

५.३.३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झाल्यानंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे.

५.३.४. शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगावेत.

५.३.५. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमतीबाबत अवगत करणे.

**५.४. सहाय्यक कृषि अधिकारी**

५.४.१. अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी करताना शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज, शेतकऱ्यांच्या मालकी हक्काचा ७/१२ उतारा, ८-अ, यापूर्वी इतर योजनेतून लाभ घेतलेला आहे काय, या बाबतचा तपशिल, प्राधिकृत अधिकाऱ्याचे संवर्ग प्रमाणपत्र (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती शेतकऱ्यांसाठी) आहे काय, इत्यादी सर्व अनुषंगीक बाबींची पडताळणी करावी.

५.४.२. पात्र अर्जाच्या नियोजित प्रकल्प स्थळाची तसेच ८-अ मध्ये नमूद सर्व गट/सर्वे नं. मध्ये पाहणी करुन तपासणी सूचीनुसार गांडूळ खत उत्पादन युनिट, नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट उभारणीसाठी निवड केलेली जागा योग्य आहे किंवा नाही याबाबत तपासणी करावी व तसा तपशील स्थळ पाहणी अहवालात ऑनलाईन नमूद करून प्रकल्पाच्या DBT APP द्वारे भौगोलिक स्थानांकन (GEO-TAGGING) करावे. नियोजित प्रकल्प स्थळ व लाभार्थी सदर घटकासाठी पात्र आहे किंवा नाही याबाबत DBT APP मध्ये नोंद करावी.

५.४.३. लाभार्थी गांडूळ खत उत्पादन युनिट, नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिटचे बांधकाम प्रकल्प स्थळी पुर्ण झाल्याचे कळविल्यानंतर संबंधित सहाय्यक कृषि अधिकारी यांनी, केलेले बांधकाम मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे तांत्रिक दर्जाचे असल्याबाबत मोका तपासणी करावी. तांत्रिक व आर्थिक निकषाप्रमाणे देय होणा-या अनुदानाची गणना करून अनुदान अदायगीकरिता उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे संकेतस्थळावर शिफारस करणे.

५.४.४. अनुदान मागणीसाठी देयके, खर्चाचे अंदाजपत्रक व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करणे.

५.४.५. या घटकाच्या प्रक्रियेस अनुसरून मध्यवर्ती आणि अंतिम मुल्यमापनास प्रकल्प यंत्रणेला मदत करणे.

## ५.५. उप कृषी अधिकारी

उप कृषी अधिकारी यांनी सदर घटकाची पर्यवेक्षकीय तपासणी करावी. तसेच शेतकऱ्यांना शेतामध्ये गांडूळ खत, नाडेप कंपोस्ट पद्धतीने सेंद्रिय खत तयार करण्यासाठी प्रवृत्त करावे.

## ५.६. मंडळ कृषी अधिकारी :

५.६.१. मंडळ कृषी अधिकारी यांनी आपल्या मंडळात उभारण्यात येणारे उत्पादन युनिट हे प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार उभारण्यात येत असल्याची वेळोवेळी तपासणी करावी.

५.६.२. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी अवगत केल्यानंतर राबविलेल्या घटकाची पर्यवेक्षकीय तपासणी करावी. तसेच शेतकऱ्यांना शेतामध्ये गांडूळ खत, नाडेप कंपोस्ट पद्धतीने सेंद्रिय खत तयार करण्यासाठी प्रवृत्त करावे.

## ५.७. तालुका कृषि अधिकारी

५.७.१. शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छानणी, ग्राम कृषि विकास समितीची मान्यता व स्थळ तपासणी अहवाल विचारात घेवून अर्जाच्या पात्रतेबाबत निर्णय घ्यावा.

५.७.२. अर्ज सादर केलेल्या पात्र शेतकऱ्यांस अंदाजपत्रकाची छानणी करून ऑनलाईन पूर्वसंमती द्यावी.

५.७.३. सदर पूर्वसंमती हीच सदर अंदाजपत्रकांसाठी तांत्रिक मान्यता असेल.

५.७.४. लाभार्थी शेतकऱ्याने ऑनलाईन अवगत केल्यानंतर सहाय्यक कृषी अधिकारी यांचेकडून तपासणी पूर्ण करून घ्यावी.

५.७.५. शेतकऱ्यांना वेळोवेळी विविध क्षेत्रीय कार्यक्रमांच्या माध्यमातून सेंद्रिय निविष्ठा वापर व उत्पादन करणेबाबत मार्गदर्शन करावे.

५.७.६. पूर्वसंमती दिलेल्या शेतकऱ्यांचे सदर घटकासंदर्भात प्रशिक्षण आयोजित करावे.

## ५.८.उपविभाग स्तर (लेखाधिकारी)

५.८.१. अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून शिफारशीत करण्यात आलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार असल्याची खात्री करावी.

५.८.२. पात्र प्रस्तावांना उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

## ५.९. उपविभागीय कृषि अधिकारी

५.९.१. सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडून अनुदान शिफारस प्राप्त झालेनंतर पात्र लाभार्थींच्या आधार संलग्न बँक खात्यावर डीबीटीद्वारे अनुदान अदायगी करण्यास मंजुरी द्यावी.

५.९.२. उपविभागांतर्गत राबविलेल्या घटकांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.

**५.१०. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी**

५.१०.१.जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.

५.१०.२.जिल्ह्यांतर्गत राबविलेल्या घटकांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे

**५.११. विभागीय कृषि सहसंचालक**

५.११.१.विभागस्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.

५.११.२.विभागस्तरावर राबविलेल्या घटकांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे

**५.१२.पर्यवेक्षीय तपासणी**

| अ.क्र. | अधिकारी | तपासणी टक्केवारी |
|---|---|---|
| १. | विभागीय कृषि सहसंचालक | ०.५ % |
| २. | नोडल अधिकारी, विकृससं कार्यालय | ०.५ % |
| ३. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ % |
| ४. | नोडल अधिकारी, जिअकृअ कार्यालय | १ % |
| ५. | उपविभागीय कृषि अधिकारी | ३ % |
| ६. | तालुका कृषि अधिकारी | ५ % |
| ७. | मंडळ कृषि अधिकारी | १५ % |
| ८. | उप कृषि अधिकारी | २५ % |

**(परिमल सिंह)**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,मुंबई**

**हमीपत्र**

**गांडूळ खत उत्पादन युनिट**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी “ **गांडूळ खत उत्पादन युनिट** ” या घटकासाठी डीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करीत आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनामधील विहीत अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र मी सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. गांडूळ खत उत्पादन युनिटसाठी अर्ज केलेली शेतजमीन माझ्या मालकीची आहे.

२. गांडूळ खत उत्पादन युनिट उभारणीकरीता मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रे मी प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्यास बांधील आहे.

३. यापूर्वी मी कोणत्याही शासकीय योजनेमधून गांडूळ खत उत्पादन युनिट करीता अनुदान घेतलेले नाही.

४. गांडूळ खत उत्पादन युनिट उभारणी काम पुर्ण करण्यासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही याची मला जाणीव आहे.

५. गांडूळ खत उत्पादन युनिट उभारणीचे काम मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकषांनुसार पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.

६. प्रकल्पांतर्गत शासनाने गांडूळ खत उत्पादन युनिट उभारणीकरिता ठरवून दिलेल्या खर्च प्रमाणकापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी माझी राहील याची मला कल्पना आहे .

७. गांडूळ खत उत्पादन युनिटची उभारणी प्रकल्प स्थळी झाल्यानंतर देय अनुदान मागणीसाठी विहित नमुन्यातील काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र डीबीटी पोर्टलवर अपलोड करीन.

८. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

**हमीपत्र**

**नाडेप खत उत्पादन युनिट**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी **" नाडेप खत उत्पादन युनिट "** या घटकासाठी डीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करीत आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनामधील विहीत अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र मी सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

९. नाडेप खत उत्पादन युनिटसाठी अर्ज केलेली शेतजमीन माझ्या मालकीची आहे.

१०. नाडेप खत उत्पादन युनिट उभारणीकरीता मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रे मी प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्यास बांधील आहे.

११. यापूर्वी मी कोणत्याही शासकीय योजनेमधून नाडेप खत उत्पादन युनिट करीता अनुदान घेतलेले नाही.

१२. नाडेप खत उत्पादन युनिट उभारणी काम पुर्ण करण्यासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही याची मला जाणीव आहे.

१३. नाडेप खत उत्पादन युनिट उभारणीचे काम मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकषांनुसार पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.

१४. प्रकल्पांतर्गत शासनाने नाडेप खत उत्पादन युनिट उभारणीकरिता ठरवून दिलेल्या खर्च प्रमाणकापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी माझी राहील याची मला कल्पना आहे .

१५. नाडेप खत उत्पादन युनिटची उभारणी प्रकल्प स्थळी झाल्यानंतर देय अनुदान मागणीसाठी विहित नमुन्यातील काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र डीबीटी पोर्टलवर अपलोड करीन.

१६. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

## मंजूर बाबीचे काम पूर्ण झाल्यावर लाभार्थी शेतक-याचा काम पूर्णत्वाचा अहवाल

**प्रति,**
**तालुका कृषि अधिकारी**
..............................

मी श्री / श्रीमती ------------------------------------------- गांव ---------------------- तालुका ---------------------- जिल्हा.--------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, तालुका कृषि अधिकारी यांच्या पूर्व संमतीपत्र क्र.................................. दिनांक / /२० अन्वये मला मंजूर केलेल्या . . . . . . . . . . . . . . . . . . या घटकाचे काम मी दिनांक ........................ अखेर १०० टक्के पूर्ण केले आहे.

कृपया, . . . . . . . . . . . . . . . . . . . .. या बाबीसाठी केलेल्या बांधकामाचे मोजमाप घेऊन त्यापोटी देय अनुदान माझ्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात यावे, ही विनंती.

दिनांक ........................

अर्जदाराची सही / अंगठा
श्री/श्रीमती

## मोका तपासणी अहवाल

(सहाय्यक कृषि अधिकारी यांनी करणे)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | गावाचे नाव | |
| ३. | तालुका | |
| ४. | जिल्हा | |
| ५. | तपासणी दिनांक | |
| ६. | बाब | |
| ७. | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ८. | मंजूर असलेल्या प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ——— | क्षेत्र ----------हे. -----आर |
| ९. | बांधकाम व्यवसायिकाचे नाव | |
| १०. | विक्रेत्याचे नाव | |
| ११. | मंजूर बाबींचा तपशील | गांडूळ खत उत्पादन युनिट/नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट<br>(रु.) ----------------- |
| १२. | मार्गदर्शक सूचनेतील निकषानुसार घटक राबविताना उणीवा आढळल्यास त्याचा थोडक्यात तपशील | |
| १३ | उपलब्ध जनावरे (गाय/ म्हैस/बैल) | |
| १४. | अनुदानाची गणना: (गांडूळ खत उत्पादन युनिट/ नाडेप खत उत्पादन याचे आर्थिक मापदंडा प्रमाणे रक्कम, अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>बाब- ----------------<br>तांत्रिक व आर्थिक मापदंड रक्कम - रु. --------------<br>अनुदान मर्यादा- रु. ---------------<br>मंजूर अनुदानाची रक्कम- रु. ------------ | |

| | |
|---|---|
| | तपासणीनुसार देय होणारी रक्कम- रु. ----------- |

सेंद्रिय निविष्ठा अंतर्गत गांडूळखत उत्पादन युनिट /नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट उभारणी तांत्रिक निकषानुसार आहे/नाही. या घटकांतर्गत उभारणी मार्गदर्शक सूचनेनुसार असून इतर बाबींतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असलेने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे/नाही.

समक्ष-

**लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी /अंगठा**

**(श्री. )**

**स्वाक्षरी सहाय्यक कृषि अधिकारी**

**दिनांकीत स्वाक्षरी**

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

गांडूळ खत युनिट टाकी बांधकाम साहित्याचे खर्चाचे विवरणपत्र

| अ. क्र. | बाब | परिमाण | दर रु. | मनुष्य दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | काडी कचरा गोळ करणे व ढिग लावणे, टाकी भरणे, पाणी मारणे व काढणे, शेड तयार करणे (आवश्यक अकुशल मजुर) | | | | |
| २ | शेणाचा वापर (स्वत: कडील) | | | | |
| ३ | टाकीचे विट बांधकाम (३.६ X १ X ० ७५.मी.) साहित्य व कुशल मजुरासह | | | | |
| ४ | आवश्यक गांडूळ १ कि.ग्रा. | | | | |
| ५ | टाकीवर कच्चे शेड तयार करणे (साहित्य स्वतःकडील ) | | | | |
| | एकूण | | | | |

नाडेप खत युनिट टाकी बांधकाम साहित्याचे खर्चाचे विवरणपत्र

| अ. क्र. | बाब | परिमाण | दर रु. | मनुष्य दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | काडी कचरा गोळ करणे व ढिग लावणे, टाकी भरणे, व्यवस्थापन पाणी मारणे व काढणे (आवश्यक अकुशल मजुर) | | | | |
| २ | शेणाचा वापर (स्वत: कडील) | | | | |
| ३ | टाकीचे विट बांधकाम ( ३.६ X १.५ X ०. ९ मी.) साहित्य व कुशल मजुरासह | | | | |
| | एकूण | | | | |

# पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती ______________________________ |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री/श्रीमती. ______________________________<br>पदनाम ______________________________<br>२. श्री/श्रीमती ______________________________<br>पदनाम ______________________________ |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>वर्गवारी: ____________ (अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर)<br>मु.पो. _______________ तालुका : ________________<br>उपविभाग : ______________ जिल्हा :______________ |
| ६. | बाब | |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ८. | कामाचा कालावधी | |
| ९. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. गांडूळ खत उत्पादन युनिट/नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट आकारमान<br>..................... (मी/फूट) |

| | | |
|---|---|---|
| १०. | लाभार्थ्यास शिफारस करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| १३. | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १४. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १५. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |
| १६. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |
| | | |

सहाय्यक कृषि अधिकारी/ उप कृषि अधिकारी यांचे मोका तपासणी, मंजूर आराखडा व मार्गदर्शक सूचनेनुसार काम पूर्ण झाले असून त्याबाबत मी स्वत: खात्री केली आहे.

तपासणी अधिकारी, श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी
(नाव ......................................................)